महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३३४ वा | दिनांक : १७/११/२०२५ | वार : सोमवार

## बीडमध्ये अजित पवार गटाला मोठा धक्का : योगेश क्षीरसागरांचा सपत्नीक भाजपमध्ये प्रवेश



**छत्रपती संभाजीनगर :** नगरपालिकेच्या निवडणुका तोंडावर असताना जिल्ह्याच्या राजकारणात मोठी हालचाल झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला बीडमध्ये मोठा धक्का बसला आहे. शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर यांचे भाऊ योगेश क्षीरसागर यांनी अजित पवारांची साथ सोडून थेट भाजपचा हात धरला आहे. आज छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत त्यांचा प्रवेश सोहळा पार पडला. आता योगेश क्षीरसागर हे भाजपच्या 'कमळ' चिन्हावरून बीड नगरपालिका निवडणूक लढवणार आहेत.

अजित पवारांच्या पक्षाची साथ सोडण्यामागील कारणे सांगताना योगेश क्षीरसागर यांनी महत्त्वपूर्ण विधान केले. "राष्ट्रवादी सोडण्यामागे काही कारणे होती, आता मात्र मोकळा श्वास घेतल्याची भावना आहे," असे ते म्हणाले. या विधानामुळे बीडमधील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील अंतर्गत धुसफूस पुन्हा एकदा समोर आली आहे.

योगेश क्षीरसागर यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, "पक्षाचा राजीनामा दिल्यानंतर पंकजा मुंडे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते भाजपमध्ये प्रवेश करत आहे. स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने आधीपासूनच तयारी करत होतो. आता आपण भाजपच्या कमळ चिन्हावर निवडणूक लढवत आहोत." दरम्यान, योगेश क्षीरसागर हे आता कमळ चिन्हावर निवडणूक लढवणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी महायुती झाली नाही, तर योगेश क्षीरसागर हे आमदार बंधू संदीप क्षीरसागर यांच्याविरोधात राजकीय मैदानात दिसण्याची शक्यता आहे.

नगरपालिका निवडणुकीसाठी अर्ज भरण्याचा सोमवारी शेवटचा दिवस असल्याने योगेश क्षीरसागर यांनी वेळ न दवडता भाजप प्रवेशाची घोषणा केली. त्यांच्या कुटुंबाची बीड नगरपालिकेवर दीर्घकालीन पकड राहिलेली असून त्यांचे वडील डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांची सत्ता येथे जवळपास निर्विवाद मानली जाते. त्यामुळे योगेश क्षीरसागर यांच्या भाजप प्रवेशामुळे बीडमधील राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल घडू शकतो. नगरपालिका निवडणूक जवळ येत असताना झालेल्या या प्रवेशामुळे बीडमधील राजकारणात नवीनच चुरस निर्माण झाली आहे.

## शिवाजी स्मारक उद्घाटनात अमित ठाकरेंचा दमदार पवित्रा



**मुंबई :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते अमित ठाकरे आज नवी मुंबईच्या दौऱ्यावर असताना, नेरूळ येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे अनावरण अनेक महिन्यांपासून झाले नसल्याचे आणि महाराजांची मूर्ती कापडाने झाकून ठेवल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. हे पाहताच अमित ठाकरेंनी स्वतः पुतळ्याचे अनावरण केले. या घटनेमुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते आणि पोलिस व मनसे सैनिकांमध्ये झटापट झाल्याचे चित्रही दिसले.

या कृतीबद्दल बोलताना अमित ठाकरे म्हणाले की, जर माझ्यावर याबद्दल कारवाई झाली, तर ती माझ्या आयुष्यातील पहिली केस असेल. पण वेळ आली तर महाराजांसाठी अशा अनेक केसेस अंगावर घेईन, असा आक्रमक पवित्रा त्यांनी घेतला.

अमित ठाकरे म्हणाले, मी शाखा उद्घाटनाच्या कार्यक्रमासाठी या भागात आलो होतो. दरम्यान मला असे कळले की छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा चार महिन्यांपूर्वीच तयार झालेला आहे. त्यावर आता धूळ साचत आहे. हा पुतळा लोकांच्या मागणीवरून लोकांसाठी झाला आहे. मात्र सरकारमधल्या कुठल्याही नेत्याला अथवा मंत्र्याला महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण करायला वेळ मिळत नसल्याचे दिसत आहे. पुतळ्यावर धूळ जमत असल्याचे मला बघवले नाही. म्हणूनच मी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण केले.

पुढे बोलताना अमित ठाकरे म्हणाले, मला असे वाटते माझ्यावर याबाबत कारवाई केली जाईल. मात्र या कारवाईचा मला आनंद आहे. माझ्या राजकीय जीवनातील जी कुठली पहिली केस असेल ती महाराजांसाठी असेल आणि त्याचा मला आनंदच असेल, असे ठाकरे यांनी यावेळी माध्यमांशी बोलताना सांगितले.

अमित ठाकरे म्हणाले की, गेल्या चार महिन्यांत अनेक नेते आणि मंत्री, अगदी पंतप्रधान मोदी विमानतळाच्या उद्घाटनासाठी तसेच मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री दहीहंडी व पक्ष प्रवेशाच्या वेळी नवी मुंबईत येऊन गेले. मात्र ज्यांना आपण आराध्य दैवत मानतो त्या छत्रपतींसाठी त्यांना वेळ मिळत नसेल, तर ही अत्यंत दुर्दैवी गोष्ट आहे. महाराजांना कपडा बांधून ठेवलेले आम्हा मनसे सैनिकांना आणि नवी मुंबईकरांना बघवले नाही, म्हणूनच आज आम्ही पुतळ्याचे अनावरण केले, असे स्पष्टीकरण त्यांनी दिले.

## सुनील तटकरेंची भरत गोगावलेंवर टोलेबाजी : म्हणाले- मी जाड भिंगाचा चष्मा लाऊन पाहिले, पण महाडमध्ये विकास दिसलाच नाही

**रायगड :** राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे खासदार सुनील तटकरे यांनी पुन्हा एकदा शिवसेना शिंदे गटाचे नेते व मंत्री भरत गोगावले यांच्यावर नाव न घेत टीका केली आहे. हजारो कोटींची विकासकामे झाल्याचे बोणाऱ्यांची कामे मी जाड भिंगाचा चष्मा लाऊन पाहिली, दुर्बिण लाऊनही शोधली. पण महाडमध्ये विकास दिसलाच नाही, अशा शब्दांत तटकरे यांनी टोला लगावला आहे.

महाड नगरपरिषद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा कार्यक्रम सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत पार पडला, त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना भरत गोगावले यांच्यावर हल्लाबोल केला. तटकरे म्हणाले की, या निवडणुकीत त्यांच्यासमोर खूप महत्त्वाचे अजेंडे आहेत, विशेषतः गेल्या चार वर्षांपासून शहरात स्थानिक लोकप्रतिनिधी नसल्याने निर्माण झालेल्या समस्यांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

सुनील तटकरे म्हणाले, मी अनेकांचे वक्तव्य ऐकतो की, महाड शहरात काही हजार कोटी रुपयांचा निधी आणला. शहरामध्ये मी फिरलो. दुर्बिण लावून बघितले. जाड भिंगाचा चष्मा लावला. पण मला तसं काही कुठे दिसले नाही. प्राथमिक शाळेची दुर्दैवी अवस्था पाहिली. ते पाहिल्यानंतर कुठे नेऊन ठेवलाय महाड? अशी स्थिती गेल्या चार वर्षात झालेली पाहायला मिळत आहे. महाड शहरात अनेक विकास कामे रखडली असून यावर बोलायला खूप वेळ आहे, असे म्हणत तटकरे यांनी गोगावले यांच्यावर टीका केली आहे.

रायगड जिल्ह्यात शिवसेना शिंदे गट आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमधील वाद सतत वाढत आहे. महाड येथे माध्यमांशी बोलताना सुनील तटकरे यांनी शिवसेनेचे आमदार महेंद्र दळवी यांनी केलेल्या वक्तव्यांचा जोरदार समाचार घेतला. तटकरे म्हणाले की, दळवींनी केलेली वक्तव्ये निंदनीय आहेत आणि जो कोणी माझ्यावर टीका करत आहे, ती माणसे न्यूनगंड आणि भयगंडाने पछाडलेली आहेत. त्यांनी शिंदे सेनेच्या आमदारांना इशारा देत स्पष्ट केले की, राष्ट्रवादी आणि भाजप एकत्र येऊन नेटाने काम करतील.

दरम्यान, मंत्री भरत गोगावले यांच्या बालेकिल्ल्यात असलेल्या महाडमध्ये, भाजप आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने आज मोठे शक्ती प्रदर्शन करत उमेदवारांचे अर्ज दाखल केले. महाड नगरपालिकेच्या या निवडणुकीत राष्ट्रवादीने भाजपसोबत युती केली असून, ते शिंदे गटाच्या शिवसेनेला शह देण्यासाठी जोरदार तयारीने रणांगणात उतरले आहेत. या युतीनुसार, राष्ट्रवादी १५ जागांवर तर भाजप ५ जागांवर निवडणूक लढवणार असून, नगराध्यक्षपद राष्ट्रवादीकडे राहणार आहे. भाजपने राष्ट्रवादीसाठी हातमिळवणी केल्यामुळे, शिंदे सेनेला कोंडीत पकडण्याचा खासदार सुनील तटकरे यांचा डाव यशस्वी होतो का, हे पाहणे यंदाच्या चुरशीच्या निवडणुकीत महत्त्वाचे ठरणार आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १७ नोव्हेंबर २०२५

## मुसाफिर

मुसाफिर है सारे यहाँ....
जाना किधर है
किसी को नहीं पता
बस चल रहे हैं
यहाँ से वहाँ
मुसाफिर है सारे यहाँ.....

ना मंजिल का पता है
ना खुद का है पता है
बस भटक रहे हैं
यहाँ से वहाँ
मुसाफिर है सारे यहां....

जो जिधर चला
सब उसी के पीछे
चल रहे सब भेड़ चाल
यहाँ से वहाँ
मुसाफिर है सारे यहाँ.....

जो चले लीक से हटकर
उसे समझती है दुनिया
धरा का महामूर्ख
यहाँ से वहाँ
मुसाफिर है सारे यहाँ......

जिसने चलके दिखाया
जमाने से अलग
नाम उसका हुआ रौशन
यहाँ से वहाँ
मुसाफिर है सारे यहाँ......



सुमंगला सुमन
मुम्बई

प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

# ठाकरवाडी शाळेत बिरसा मुंडा यांची १५० वी जयंती उत्साहात साजरी



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** दिनांक १५ नोव्हेंबर शनिवार रोजी जि.प. प्रा. शाळा ठाकरवाडी येथे आदिवासी जननायक क्रांतिसूर्य बिरसा मुंडा यांची १५० वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. स्वातंत्र्यसंग्रामातील महान योद्धा आणि अन्यायाविरोधातील तेजस्वी प्रतीक असलेल्या बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त शाळेत प्रेरणादायी कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं. कार्यक्रमास गावचे सरपंच श्री. राणी चांडे, ग्रामसेविका श्रीमती भारती पाटील, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष वंधना मेंगाळ ग्रामस्थ,बाळु मधे बबन कातवारे वाळुबा मधे गावातील तरुण मंडळी, आशा सेविका, अंगणवाडी कार्यकर्त्या आणि शाळेचे मुख्याध्यापक लहाने सहशिक्षक श्री भालेराव श्री गालफाडे श्रीमती घोरपडे श्रीमती साबळे व शाळेतील सर्व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.ठाकरवाडीत जनजागृती फेरी काढण्यात आली विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कविता, घोषवाक्ये, चारोळ्या आणि माहितीपर भाषणांमुळे वातावरण प्रेरणादायी बनले. बिरसा मुंडा यांचे संघर्षमय जीवन, ‘उलगुलान’ आंदोलनातील भूमिका, आदिवासी समाजासाठी केलेले अप्रतिम योगदान याची उजळणी विद्यार्थ्यांनी प्रभावीपणे केली. मान्यवरांनी आपल्या मनोगतामध्ये विद्यार्थ्यांना धैर्य, प्रामाणिकपणा, निसर्गप्रेम आणि समाजसेवा ही बिरसा मुंडा यांची मूल्ये आचरणात आणण्याचा संदेश दिला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व मान्यवर, ग्रामस्थ, शिक्षकवर्ग व विद्यार्थ्यांचे जि.प.प्रा. शाळा ठाकरवाडी यांच्या वतीने मन:पूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

# कन्नड येथे नृत्याद्वारे विद्यार्थ्यांनी केली मतदार जनजागृती




**कन्नड (अरुण थोरात) :** आगामी होणाऱ्या कन्नड नगर परिषद मतदाना साठी कन्नड नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने मतदार जनजागृतीसाठी विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत.त्याचाच एक भाग म्हणून निवडणूक निर्णय अधिकारी एकनाथ बंगाळे यांच्या संकल्पनेतून भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीच्या निमित्ताने कन्नड शहरातील विविध ठिकाणी मतदार जनजागृती करण्यात आली, एकनाथ बंगाळे व मुख्याधिकारी रवींद्र लांडे यांनी उपस्थित मतदारांना भरभरून मतदान करण्याचे आवाहन केले. यावेळी स्वीप पथकाचे योगेश पाटील, भाग्यश्री बेडगे, प्रवीण दाभाडे, प्रतिभा कदम, भाऊसाहेब सोननीस, दिपक सोनवणे, कन्नड आगाराचे संघर्ष पगारे, सागर पाटील, बापूसाहेब मोरे, श्रीराम पवार यांची उपस्थिती होती.जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित काशिनाथ पाटील जाधव प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थिनींनी भगवान बिरसा मुंडा यांच्या स्मृतीस वंदन करणारे आदिवासी गीतावर नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली, यात श्रेया थेटे अनुष्का शेगडे प्रतीक्षा जाधव सायली मालकर गीतांजली मगर वेदिका वाघ राधिका गायकवाड अनुजा मगर सौंदर्या थेटे राणी पवार मानवी राठोड मोनाली राठोड विद्या राठोड प्रांजल राठोड या विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला होता, यांना सुनीता दाबके व प्रवीण दाभाडे यांचे मार्गदर्शन लाभले

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १७ नोव्हेंबर २०२५

## क्रांती सूर्य स्वातंत्र्य सेनानी बिरसा मुंडा यांच्या १५० व्या दिनानिमित्य जनजाती गौरव दिन व्याख्यानाचे आयोजन



**नागपूर (प्रा. डा. चंद्रशेख पाटील)** : स्थानिक डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू एस कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, कामठी रोड येथे नुकतेच उत्साहात आदिवासी जन नायक आणि स्वातंत्र्य सेनानी बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंती निमित्य व्याख्यान आयोजन करण्यात आले. याप्रसंगी डॉ.दिनेश शेराम, पदवीधर अधिसभा सदस्य,रा. तु. म. नागपूर विद्यापीठ यांना प्रमुख अतिथी म्हणून आणि डॉ. प्रथमेश फुलेकर, सिनेट सदस्य, रा. तु. म. नागपूर विद्यापीठ यांना विशेष अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. या समारोहाचे अध्यक्ष स्थान कार्य. प्राचार्या डॉ. प्रज्ञा बागडे यांनी भूषविले. याप्रसंगी उप प्राचार्या प्रा. गामिनी मेश्राम आणि एम. सी. व्ही. सी. विभाग प्रमुख प्रा. रेखा बावनकुळे आणि सांस्कृतीक विभाग प्रमुख डॉ. चंद्रशेखर पाटील यांची विशेष उपस्थिती होती. . याप्रसंगी बोलताना डॉ. शेराम यांनी सर्वांना बिरसा मुंडा यांच्या जयंती च्या शुभेच्छा दिल्या. बिरसा मुंडा ही एक वैचारिक क्रांती आहे.आज सर्व भारतीयांना त्यांच्या कर्तृत्वाची जाणीव असणे अतिशय आवश्यकता आहे. विदयापीठामध्ये बिरसा मुंडा अध्यासन स्थापन करण्यासाठी बराच संघर्ष करावा लागला. आणि सर्व विद्यार्थ्यांना धरती आबा बिरसा मुंडा यांचे असामान्य कर्तृत्व समजावे यासाठी हे अध्यासन लवकरच कार्यान्वित होणार आहे. जागतिक स्तरावर बिरसा मुंडा यांच्या बलाढ्य इंग्रजी राजवटी विरोधात ऐतिहासिक जल, जंगल आणि जमीन यासाठी उभारलेल्या उलगुलान लढ्याची दखल घेतली जावी आणि गौरवशाली आदिवासी संस्कृती ची सर्व जगात सन्मान पूर्वक ओळख निर्माण व्हावी. असे विचार व्यक्त केले. डॉ. प्रथमेश फुलेकर यांनी देखील आदिवासी अस्मितेचे जनक बिरसा मुंडा यांच्या महान कार्याचा गौरव आपल्या विशेष अतिथी वक्तव्यातून केला. याप्रसंगी डॉ. दिनेश शेराम आणि डॉ. प्रथमेश फुलेकर यांचा विशेष सत्कार महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आला. याप्रसंगी आजच्या प्रत्येक महाविद्यालयीन युवक आणि युवती ने बिरसा मुंडा यांच्याकडून सामाजिक क्रांतिकारी विचार आणि स्वाभिमानी मनोवृत्तीचा आदर्श घ्यावा. याप्रसंगी महाविद्यालयाच्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांनी आदिवासी संस्कृतीचा गौरव अधोरेखित करणारे नृत्य सादर करून बिरसा मुंडा यांच्या कार्यास अभिवादन केले. कार्यक्रमांची प्रास्ताविक भूमिका आणि अतिथिंचा परिचय सभागृहास डॉ. चंद्रशेखर पाटील यांनी करून दिला. या व्याख्यान सत्राचे सूत्रसंचालन डॉ. रागिणी चौधरी यांनी केले. तर प्रा. टेकाम यांनी उपस्थितांचे आभार मानले. याप्रसंगी वरिष्ठ आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक वृंद, अंशकालीन प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी आवर्जून उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता महाविद्यालय परंपरेनुसार राष्ट्र गीताने करण्यात आली.

## डॉ. रजत बाफना यांचा प्रवरा संस्थेतील बीडीएस समारंभात गौरव



**छत्रपती संभाजीनगर (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे)** : जे.ई.एस. महाविद्यालय जालना येथील उपप्राचार्य प्राध्यापक प्रवीण बाफना यांचे चिरंजीव डॉ. रजत बाफना यांनी वैद्यकीय क्षेत्रात बीडीएस अभ्यासक्रम यशस्वीरेता पूर्ण केला असून, त्यांना लोणी येथील प्रवरा एज्युकेशन रुरल संस्थेच्या १९ व्या पदवीदान समारंभात पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

### जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

## अतनुरात ८० टक्के लाभार्थीचे घरोघरी जाऊन केले प्रमाणीकरण



**अतनुर/मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाअंतर्गत जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे व जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकटेश रावलोड यांच्या आदेशान्वये विशेष लाभार्थी प्रामाणिकरण द्वारे दिव्यांग, अपंग, परितक्त्या, विधवा, जेष्ठ नागरिक, वयोवृध्द, निराधार, अंत्योदय रास्त धान्य ग्राहक कार्ड धारक यांचे जळकोटचे तहसीलदार राजेश लांडगे यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली व सूचनेप्रमाणे जळकोट तालुक्यातील अतनूर येथील 80 टक्के लाभार्थी प्रमाणीकरण प्रक्रिया शिबिर दि. 13 रोजी गुरुवारी सकाळी पासून ते सायंकाळ पर्यंत यशस्वीरित्या पार पाडले. या शिबिरामुळे लाभार्थ्यांची माहिती अद्ययावत होण्यास मदत झाली. या शिबिरात लाभार्थ्यांची कागदपत्रे तपासण्यात आली आणि त्यांच्या नोंदी अद्ययावत करण्यात आल्या. परंतु ही प्रक्रिया सामान्यपणे शिधापत्रिका आणि सार्वजनिक वितरण प्रणालीशी संबंधित आहे. असून या शिबिराचा उद्देश आणि कार्यपद्धती नुसार लाभार्थी ओळख आणि प्रमाणीकरण होतो. शिबिरामध्ये लाभार्थ्यांची ओळख पटवून त्यांची कागदपत्रे तपासण्यात आली. यावेळी माहिती अद्ययावत करणे, शिधापत्रिका आणि संबंधित योजनांशी संबंधित लाभार्थ्यांची माहिती अद्ययावत करणे हे मुख्य उद्दिष्ट होते. सार्वजनिक वितरण प्रणालीची कार्यक्षमता सुधारणे: या प्रक्रियेमुळे सार्वजनिक वितरण प्रणाली अधिक प्रभावीपणे चालण्यास मदत होते. सदरील लाभार्थी प्रामाणिकरण करिता पुरवठा विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी दिव्यांग, अपंगाच्या घरोघरी, दारोदारी जाऊन बायो तथा मशीनद्वारे लाभार्थी रास्त भाव धान्य कार्डधारकांची प्रामाणिकरण केले. यावेळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकटेश रावलोड व तहसीलदार राजेश लांडगे यांच्या विशेष आदेशान्वये व सूचनेप्रमाणे जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकटेश रावलोड, तहसीलदार राजेश लांडगे, निरीक्षणाधिकारी अर्पण राऊत, पुरवठा सहाय्यक रविंद्र गाजरे, पुरवठा ऑपरेटर माधव सातापुरे, कोंडिबा गवळे, विशाल नाटके, वैजनाथ पवार, महाराष्ट्र शासननियुक्त ग्राहक संरक्षण परिषदेचे शासननियुक्त अशासकीय सदस्य बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर, ग्राहक जनजागरण व मार्गदर्शन संस्थेचे प्रदेशाध्यक्ष बी.जी. शिंदे अतनूरकर, रास्त भाव धान्य दुकानदार शिवाजी नारायण कदम माजी सैनिक यांनी विशेष परिश्रम घेतले.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १७ नोव्हेंबर २०२५

# विद्यार्थी : नवयुगाच्या परिवर्तनाचे वाहक

आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन हा केवळ एका दिवसाचे स्मरण नाही; तो समाजाच्या उत्क्रांतीतील विद्यार्थी या शक्तिशाली घटकाची ओळख करून देणारा ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि तात्त्विक प्रक्रियेचा जीवंत पुरावा आहे. 17 नोव्हेंबर हा दिवस जगभरात अशा विद्यार्थ्यांच्या स्मरणार्थ पाळला जातो, ज्यांनी शिक्षण, स्वातंत्र्य, मानवाधिकार आणि ज्ञानस्वातंत्र्यासाठी संघर्ष केला. विद्यार्थी हे समाजाचे प्रतिबिंब मानले जातात; समाजातील मूल्ये, संघर्ष, धारणा, आकांक्षा आणि भविष्यदृष्टी विद्यार्थीवर्गात प्रकर्षाने दिसून येतात. म्हणूनच या दिवसाचे महत्त्व केवळ शैक्षणिक घटकापुरते मर्यादित नसून, समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून ते मानवी सभ्यतेच्या विकासाचा मूलभूत आधार आहे.जगातील विविध संस्कृती, जात-धर्म, भाषा, आर्थिक स्तर आणि राजकीय परिस्थिती यामुळे एक बहुविध विद्यार्थीसमूह निर्माण होतो. हा विद्यार्थीवर्ग ही केवळ शाळा-कॉलेजांतून शिक्षण घेणारी मंडळी नसून, समाजरचनेतील शिक्षित नागरिक होण्याची प्रक्रिया अंगीकारणारी व्यक्ती आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने विद्यार्थी म्हणजे समाजातील सामाजिक परिवर्तनाची प्रयोगशाळा होय. विद्यार्थीदशा ही मानवी जीवनातील सर्वात निर्मितीक्षम अवस्था आहे. मूल्यांची रुजवण, विचारांची परिपक्वता, सामाजिक न्यायाची भावना, समावेशकतेचा विकास आणि नागरी जबाबदारीची जाणीव यांची सुरुवात याच काळात दृढ केली जाते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन हा आधुनिक समाजाच्या चौकटीत विद्यार्थ्यांना असणाऱ्या कर्तव्य आणि जबाबदाऱ्यांची जाणीव करून देणारा दिवस आहे.या दिवसाचा इतिहास अत्यंत प्रेरणादायी आहे. 1939 मध्ये नाझीवादाच्या विरोधात उभे राहिलेले चेकोस्लोव्हाकियातील विद्यार्थी हे स्वातंत्र्य आणि मानवाधिकारांसाठी लढणाऱ्या युवा पिढीचे प्रतीक बनले. त्यांच्या बलिदानाने जगभरात विद्यार्थ्यांचे अस्मितासंघर्ष, सामाजिक न्यायाच्या लढाया आणि बौद्धिक क्रांतीची सुरुवात केली. समाजशास्त्रानुसार विद्यार्थी आंदोलन ही सामाजिक बदलांची ऊर्जा असते. समाजातील अन्याय, दडपशाही, आर्थिक विषमता किंवा राजकीय अस्थैर्य यावर सर्वप्रथम प्रतिक्रिया विद्यार्थ्यांकडून येते. कारण विद्यार्थ्यांकडे विचारांची निर्भयता, प्रश्न विचारण्याची सवय आणि चुकीच्या व्यवस्थेविरोधात उभे राहण्याची मानसिकता असते. हीच वैशिष्ट्ये त्यांना सामाजिक प्रगतीचे वाहक बनवतात.आजच्या काळातील विद्यार्थी हे जागतिकीकरणाच्या वेगवान प्रक्रियेत वाढलेले 'ग्लोबल सिटिझन्स' आहेत. माहिती आणि तंत्रज्ञानाच्या विस्फोटाने त्यांच्यापर्यंत ज्ञानाचे असंख्य मार्ग खुले केले आहेत. सामाजिक माध्यमे, डिजिटल साधने, ऑनलाईन शिक्षण, आंतरराष्ट्रीय एक्स्चेंज प्रोग्रॅम्स, विविध देशांच्या शैक्षणिक संधी या सर्वांमुळे विद्यार्थीवर्ग एक जागतिक समुदाय बनला आहे. तथापि, या जागतिकीकरणात विषमता, भेदभाव, ओळख संघर्ष आणि मानसिक दडपण या समस्या देखील वाढल्या आहेत. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, आधुनिक शिक्षणव्यवस्थेत 'कौशल्याधारित स्पर्धा' वाढली असली तरी 'मानवी मूल्ये' आणि 'सामाजिक जबाबदारी' यांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन अशा स्थितीत विद्यार्थ्यांना केवळ करिअर-केंद्रित नव्हे, तर मूल्य-आधारित आणि समाजोन्मुख दृष्टिकोन अंगीकारण्याचा संदेश देतो.शिक्षणाचा खरा उद्देश मानवाला विचारक्षम बनवणे हा आहे. विद्यार्थी जेव्हा समाजातील प्रश्नांकडे चिकित्सक नजरेने पाहू लागतात, तेव्हा समाजातील बदल अपरिहार्य होत जातो. पर्यावरणीय समस्या, लैंगिक समानता, आर्थिक न्याय, भ्रष्टाचारविरोध, मानवाधिकार, ग्रामीण-शहरी विषमता यांसारख्या मुद्द्यांवर विद्यार्थी सक्रियतेने आवाज उठवत असतात. उदा. जागतिक तापमानवाढीविरोधातील युवा आंदोलन, भारतातील विद्यार्थ्यांचे सामाजिक न्यायासाठीचे संघर्ष, असमानतेविरोधातील लढाया ही सर्व विद्यार्थीचळवळी समाजाला नवी वाट दाखवतात. समाजशास्त्रात 'सामाजिक क्रिया' ही संकल्पना विद्यार्थ्यांसाठी अत्यंत लागू पडते, कारण तेच सामाजिक कृतीचे प्रमुख घटक आणि सामाजिक क्रांतीचे जनक असतात.विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे आदर्शवाद होय. समाजात अनेकवेळा भ्रष्टाचार, अन्याय, सत्तेचा दुरुपयोग, संसाधनांचे असमान वाटप किंवा जातीय भेदभाव दिसून येतो. परंतु विद्यार्थी हा वर्ग या गोष्टींना सहज स्वीकारत नाही. त्यांच्या विचारांमध्ये नैतिकता आणि न्यायाची जाणीव प्रबळ असते. त्यामुळे विद्यार्थी हे समाजघटकांवर 'नैतिक दबाव' निर्माण करण्याचे काम करतात. यामुळे सामाजिक मूल्यांचे संरक्षण आणि समाजाच्या नैतिक अध:पतनाविरोधात विद्यार्थी महत्त्वाची भूमिका बजावतात.आजच्या काळात विद्यार्थ्यांसमोर अनेक आव्हाने उभी आहेत. मानसिक आरोग्याचा प्रश्न सर्वात गंभीर आहे. सततची स्पर्धा, कुटुंबीय अपेक्षा, समाजातील तुलना, करिअरचा दबाव, आर्थिक ताण आणि डिजिटल विचलन यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नैराश्य, चिंता आणि एकाकीपणा वाढताना दिसतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, आधुनिक समाजातील 'उत्पादकता-केंद्रित संस्कृती' विद्यार्थ्यांना यांत्रिक बनवत आहे. शिक्षणाचा आनंद, कल्पकता, संवाद, सांस्कृतिक सहभाग आणि भावनिक विकास यांना कमी महत्त्व दिले जात आहे. अशा परिस्थितीत आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन विद्यार्थ्यांना मानसिक आरोग्याला प्राधान्य देण्याची, संतुलित जीवनशैली राखण्याची आणि स्वत:बद्दल संवेदनशील राहण्याची आठवण करून देतो.दुसरे महत्त्वाचे आव्हान म्हणजे सामाजिक माध्यमांचा प्रभाव होय. सोशल मीडिया विद्यार्थ्यांना माहितीचा प्रचंड स्त्रोत देतो, पण तेवढ्याच प्रमाणात त्यांच्यात तुलना, अपप्रचार, ध्रुवीकरण आणि भ्रम निर्माण करतो. समाजशास्त्रीय भाषेत या प्रक्रियेला 'प्रतिकात्मक हाताळणी' किंवा 'माध्यम समाजीकरण' असे मानले जाते. विद्यार्थी यामुळे अनेकदा खोट्या ओळखी, खोट्या अपेक्षा आणि अवास्तव यशाच्या स्पर्धेत अडकतात. म्हणूनच समाजाने विद्यार्थ्यांना डिजिटल साक्षरतेचे खरे तत्त्वज्ञान शिकवणे आवश्यक आहे.याशिवाय ग्रामीण आणि शहरी विद्यार्थ्यांतील दरी आजही चिंताजनक आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साधनांचा अभाव, आर्थिक मर्यादा, तंत्रज्ञानाची कमतरता आणि सामाजिक रूढी यांचा सामना करावा लागतो. शहरी विद्यार्थ्यांप्रमाणे त्यांना बहुआयामी संधी उपलब्ध नसतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून ही दरी सामाजिक असमानतेचे प्रतिबिंब आहे. आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन अशा असमानतेकडे लक्ष वेधून शिक्षण सर्वसमावेशक, न्याय्य आणि लोकशाहीवादी करण्याचा संदेश देतो.विद्यार्थ्यांचे समाजातील योगदान अपार आहे. ते केवळ भविष्यातील नागरिक नसून वर्तमानातील सक्रिय घटक आहेत. सामाजिक उपक्रम, स्वयंसेवा, डिजिटल अभियान, पर्यावरण संवर्धन, विज्ञान संशोधन, सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा आणि साहित्यया सर्व क्षेत्रांत विद्यार्थी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. समाजशास्त्रातील 'युवक भांडवल' ही संकल्पना त्यांच्याशी अत्यंत निगडित आहे. ज्ञान, कौशल्य, ऊर्जा, सर्जनशीलता, नेतृत्वगुण आणि नवीन दृष्टी यामुळे विद्यार्थी समाजाच्या प्रत्येक घटकाचे पुनर्रचनाकार ठरतात.आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन आपल्याला शिकवतो की प्रत्येक विद्यार्थ्यात एक बदल घडविण्याची क्षमता दडलेली आहे. शिक्षण हा केवळ रोजगार मिळविण्याचा मार्ग नाही, तर समाजाला अधिक मानवी, समताधिष्ठित, शांतताप्रिय आणि न्याय्य बनविण्याचे साधन आहे. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, कौशल्य, नवनिर्मितीशीलता आणि संवेदनशीलता यांमुळे समाज अधिक सक्षम आणि प्रगतिशील होतो. म्हणूनच शिक्षक, पालक, शासन आणि समाजाने विद्यार्थ्यांना प्रेरणादायी वातावरण, सुरक्षितता, संधी, समुपदेशन आणि मूल्याधारित शिक्षण देणे अत्यावश्यक आहे.शेवटी, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन हा केवळ औपचारिक दिन नसून, तो विद्यार्थ्यांच्या संघर्ष, त्यांच्या स्वप्नांतील विस्तार, सामाजिक परिवर्तनातील त्यांचे योगदान आणि मानवतेसाठी त्यांच्या भूमिकेचे अभिवादन आहे. विद्यार्थी हे उद्याचे नाही तर आजचे शिल्पकार आहेत. त्यांच्या विचारांमध्ये एक समाज बदलण्याची क्षमता आहे, त्यांच्या स्वप्नांत एक जग घडविण्याची शक्ती आहे, आणि त्यांच्या कृतींत मानवतावादी भविष्यातील आशा दडलेली आहे. या दिवसाचे महत्त्व ओळखून आपण प्रत्येक विद्यार्थ्यासाठी ज्ञान, समता, स्वातंत्र्य आणि संधी यांची हमी देणारे समाज निर्माण करण्याचा संकल्प केला, तरच आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन साजरा करण्याचे खरे सार्थक होईल. विद्यार्थीवर्ग हा मानवतेचा दीपस्तंभ आहे—त्यांची उजळणी झाली, तर समाजाचा उद्याही निश्चितच अधिक उज्ज्वल होईल.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(समाजशास्त्राचे अभ्यासक)
मो. क्र. 9960103582
bagate.rajendra५@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002